केतोली
२४/०४/२६
(जाहिरनामा)

अर्जदार तर्फे वकील – अॅड.व्ही.एच.चावरे

जाहिरनामा

**मा. दिवाणी न्यायाधिश, क-स्तर, पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**(श्रीमती एस.व्ही.जंगमस्वामीसो)**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १२/२०२६**
नि.नं.७/डी

१. संजय पांडुरंग इंगळे,
व.व.४२, धंदा - नोकरी, ............ **अर्जदार.**
रा.करंजफेण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

२. राजू पांडुरंग इंगळे,
व.व.३७, धंदा - शेती, रा. सदर

३. सौ. मंगल पांडुरंग इंगळे,
व.व.७०, धंदा - घरकाम,रा. सदर

४. पांडुरंग हिंदुराव इंगळे,
व.व.७५, धंदा - शेती, रा. सदर

विरुध्द

कोणीही नाही ......... **वि.प.**

**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी अर्ज**

या जाहिरनाम्याद्वारे सर्वांना कळविणेत येते की,

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या न्यायालयाकडे दि.०५/०३/२०२६ इ. रोजी अर्ज दाखल करुन यातील दावा मिळकतीचे वर्णन : करंजफेण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील चांभारटेक नावाने ओळखणेत येणारे गट नं. ५७५ एकूण क्षेत्र हे. ०-४९ आर. आकार रु. ०.२८ पैसे पैकी क्षेत्र हे. ०-८.२ आर. आकार रु. ०.०३ पैसे पडसर जागा यासी चतुःसिमा :-

पूर्वेस : रस्ता.

पश्चिमेस : सदर गट नं. ५७५ पैकी सहदेव बापू पाटील यांची जमिन

दक्षिणेस : सदर गट नं. ५७५ पैकी बंडू शिवा कांबळे यांची जमिन.

उत्तरेस : सदर गट न. ५७५ पैकी परसू गणू महार यांची जमिन.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील गट नं. ५७५ चे क्षेत्र यातील अर्जदार व मयत बाजीराव पांडुरंग इंगळे यांनी मिळून एकत्र कुटुंबी असताना बाजीराव पांडुरंग इंगळे यांचे नावे दुय्यम निबंधक पन्हाळा यांचे कार्यालयातील रजि. द.नं. १०७७/२००० ता. २३-०५-२००० चे दस्ताने रक्कम रु. ३६०००/-छत्तीस हजारचे मोबदल्यात खरेदी केली असून ती आज अखेर खरेदी तारखेपासून खुद्द मालक नातेने अर्जदार यांचे कब्जे वहिवाटीस आहे. मयत बाजीराव पांडुरंग इंगळे यांचे नावे ७/१२ पत्रकी नोंद आहे.

बाजीराव हा त्यावेळी काहीही मिळवत नव्हता. खरेदीची संपूर्ण रक्कम ही एकत्र कुटुंबाचे उत्पननातून भरलेली रक्कम असून बाजीराव हा ता. २२-०९-२०२४ रोजी आजारपणामध्ये मयत झाला आहे व त्याचे पश्चात त्यास अर्जदार हेच एकमेव सरळ वारस आहेत अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार नं. १ ते ४ हे एकत्र कुटुंबी राहात असून त्यांनी एकमेकांचे विचार सदरचे गट नं. ५७५ चे क्षेत्र बाजीराव यांचे नावे खरेदी केलेले क्षेत्र ०.०८.२ हे त्यांनी अर्जदार नं. १ यास भविष्यात वाद नसावा या दृष्टीने कायम स्वरूपी खुद्द मालकी हक्काने देणेचे ठरविले आहे. सदरचे क्षेत्रास खरेदीपत्राप्रमाणे मयत बाजीराव पांडुरंग इंगळे यांचे नाव ७/१२ पत्रकी मालक व पिकपहाणी सदरी नोंद आहे. तरी अर्जदार यांचे दरम्यान ठरले तोंडी समझोत्याप्रमाणे सदरचे मिळकतीस बाजीराव पांडुंग इंगळे यांचे पश्चात अर्जदार नं.

१ ते ४ वारस आहेत असे ठरवून मिळावे व त्यांचे दरम्यान झाले तोंडी समझोत्याप्रमाणे सध्या अर्जदार नं. १ यांचे मालकीचे झाले आहे व त्या प्रमाणे ठराव व हुकूमनामा व्हावा व हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदार नं. १ चे नांवे मिळणेविषयी विनंती आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टमध्ये दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहिरनाम्याद्वारे कळविणेत येते की, मयत कै.बाजीराव पांडुरंग इंगळे यांना वर नमुद केले अर्जदार यांचे व्यतिरीक्त अन्य कोणी वारस असलेस अथवा नमुद अर्जदार वारस असलेबाबत हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी अगर त्यांचे तर्फे वकिल यांनी दिनांक २४/०४/२०२६ इ. रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात हजर होवून आपले लेखी म्हणणे मांडावे तसे जर झाले नाही. तर अर्जदार यांनी दाखल केलेला पुरावा गृहीत धरुन अर्जदार यांना वारसा दाखला दिला जाईल. त्यानंतर येणा-या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

आज दिनांक - १६/०३/२०२६ इ. रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

हुकमावरुन

क.लि.

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क-स्तर पन्हाळा.

प्रति,
प्रमुख बेलिफ

सदरचा जाहिरनामा मयताचे घर, ग्रामपंचायत, नोटीस बोर्ड येथे लटकून त्याचे रिपोर्ट द्यावा.

हुकूमावरुन

क.लि.

स.अ.

पाटील
गाव कामगार पोलीस पाटील
श्री. पांडुरंग चंद्रकांत पाटील
मु.पो. करंजफेण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

स.नि.डा.हा.अं.श्री/श्रौ....पांडुरंग
हिंदुराव इंगळे.......यांचा असे दस्तूर [illegible]
राजेंद्र पांडुरंग इंगळे

४) अर्जदार यांनी अशा स्वरूपाचा अर्ज अन्य कोणतेही कोर्टात दाखल केलेला नाही अगर प्रलंबित नाही.

५) सदरचे अर्जास योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लाविला आहे.

६) सबब अर्जदार यांची विनंती की,

अ) अर्जदार यांचा सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा ही विनंती व अर्जात नमूद मिळकती या अर्जदार यांना वारस नातेने मिळणेस पात्र आहेत व सर्वांनी मिळून समझोत्याने सदरची मिळकत अर्जदार नं. १ यास देणेचे ठरविलेने तसे अर्जदार नं. १ चे नावे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेविषयी विनंती आहे.

ब) जरूर तर अर्ज दुरुस्तीस परवानगी व संधी असावी.

ड) न्यायाचे सर्व ते हुकूम याच कामी व्हावेत.

पुरवणी किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १२ / २०२६

## जाहिरनामा

### बेलिफ रिपोर्ट

हुकूम प्रमाणे दि. ५/४/२०२६ रोजी दिले पत्त्याचे गावी येऊन मा. मा. पोलीस पाटील यांचे मार्फतीने अर्जदार यांचा तपास करून मे. कोर्ट हुकमावरून सदरच्या जाहिर नाम्याची एक प्रत अर्जदार यांच्या राहते घराचे उघडे दर्शनी दरवाज्यावर सहज दिसेल असे ठिकाणी डिंकाणे डकवून प्रसिद्ध केली आहे.

तसेच जाहिर नाम्याची एक प्रत ग्रामपंचायत कार्यालय यांच्या मार्फतीने नोटीस बोर्डवर डिंकाणे डकवून प्रसिद्ध केली आहे. सोबत मा. मा. पोलीस पाटील हजर होते साक्ष म्हणून त्यांची मूळ प्रतीवर सही व शिक्का केला आहे.

मी. ज. लावे दि. ५/४/२०२६

बेलिफ

### बेलिफ रिपोर्ट

हुकूम प्रमाणे दि. ८/४/२०२६ रोजी मे. कोर्ट मजकूरी हजर जाहिर नाम्याची एक प्रत मा. दिवाणी न्यायालय क.स्तर मुखेड यांच्या मार्फतीने नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केली आहे.

मी. ज. लावे दि. ८/४/२०२६

बेलिफ

### सहा. अधिक्षक रिपोर्ट

सदर हु जाहिर नामा योग्य ठिकाणी योग्य वेळी योग्य रित्या प्रसिद्ध केल्याचे बेलिफ रिपोर्ट वरून दिसून येईल.

मी. ज. लावे दि. ८/४/२०२६

8.4.26

सहा. अधिक्षक